30 SEP 2021 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरची नवी ओळख निर्माण करूया

## 'सायबर'मधील वेबिनारमध्ये पर्यटनक्षेत्रातील तज्ज्ञांचा निश्चय

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** पर्यटनाच्या माध्यमातून जिल्ह्याला नवी ओळख निर्माण करण्यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करूया असा निश्चय पर्यटन क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला. छत्रपती शाहू इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस एज्युकेशन व रिसर्च (सायबर) येथे पर्यटन संचालनालय, जिल्हा प्रशासन, सायबर महाविद्यालय व कारवा हॉलिडेज यांच्या वतीने आयोजित वेबिनारचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहूल रेखावार यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी .एस. पाटील होते.

पर्यटन संचालनालयाच्या उपसंचालक सुप्रिया करमरकर म्हणाल्या, पर्यटनक्षेत्राच्या विकासासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यासाठी समाज, संस्कृती, पर्यावरण व अर्थव्यवस्था या चार बाबींची गरज असून त्या दृष्टीने शाश्वत पर्यटन विकासावर भर दिला जात आहे. राकेश माथुर म्हणाले, क्रीडा पर्यटन, मेडिकल पर्यटन, हेरिटेज पर्यटन याबरोबरच आध्यात्मिक पर्यटन क्षेत्रामध्ये मोठी संधी निर्माण झाली आहे. चंद्रशेखर भडसावळे यांनी 'कृषी पर्यटन क्षेत्रातील संधींवर माहिती देताना त्यांनी व्हिएतनाम, सिंगापूरच्या प्रगतीचे दाखले दिले. सुधीर पाटील यांनी टूर ऑपरेटर्सना येणाऱ्या अडचणींची माहिती दिली. डॉ. पी. एस. पाटील यांनी सप्ताहाचे कौतुक केले. डॉ. अमित माने यांनी कोल्हापूरमध्ये भविष्यात मेडिकल हब होण्याची क्षमता असून यादृष्टीनं योग्य नियोजन करण्याची गरज असल्याचे सांगितले.

डॉ. सी. एस. दळवी यांनी प्रास्ताविक केले. वसीम सरकवास यांनी आभार मानले.




कोल्हापुरातील सायबर महाविद्यालय येथे मंगळवारी पर्यटन विकास या विषयावर आयोजित वेबिनारमध्ये प्र. कुलगुरु पी. एस. पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाधिकारी राहुल रेखावार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

लोकमत

# शनिवारी तुषार गांधी यांचे व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवारी (दि. २ ऑक्टोबर) महात्मा गांधी यांची जयंती आणि आंतरराष्ट्रीय अहिंसा दिनानिमित्त महात्मा गांधी यांचे पणतू, ज्येष्ठ विचारवंत तुषार गांधी यांचे सकाळी साडेदहा वाजता विशेष ऑनलाइन व्याख्यान होणार आहे. 'भारतीय स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी आणि महात्मा गांधी' या विषयावर ते संवाद साधतील. 'शिव-वार्ता' (https://www.youtube.com/c/ShivVarta) या वाहिनीवरून व्याख्यान प्रसारित होणार आहे.

लोकमत

# दहा हजार विद्यार्थ्यांनी दिली पुनर्परीक्षा

कोल्हापूर : तांत्रिक कारणास्तव शिवाजी विद्यापीठाची परीक्षा काही विद्यार्थ्यांना देता आली नव्हती. त्यांच्यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून पुनर्परीक्षा घेण्यात आली. विविध पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १०६९० विद्यार्थ्यांनी बुधवारी पुनर्परीक्षा दिली.

विविध १३ परीक्षांचे ऑनलाइन निकाल जाहीर झाले. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या परीक्षांना प्रारंभ झाला.परीक्षा मंडळाने बुधवारी बी.एस्सी. एम.एस्सी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी (सत्र दहा), ब्रिज कोर्स इन ड्रामॅटिक्स, एम. एड. आणि एम. आर. एस., एमबीए (सत्र तीन व चार), डिप्लोमा इन क्लासिकल म्युझिक व्होकल, भरतनाट्यम, कथक या अभ्यासक्रमांचा निकाल जाहीर केला आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील पर्यटन सुविधा केंद्रातर्फे जागतिक पर्यटन दिन साजरा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठातील पर्यटन प्रवास सुविधा केंद्रातर्फे जागतिक पर्यटन दिन साजरा करण्यात आला. 'कोरोना नंतरचे पर्यटन' विषयावर बोलताना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक संचालक दीपक हरणे यांनी नवनवीन संकल्पना जर राबविल्या तर कोरोनासारख्या महामारीच्या काळात सुद्धा आपण पर्यटन व्यवसाय करू शकू, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमास रत्नागिरी एमटीडीसीचे संचालक दीपक माने यांनी एमटीडीसीच्या कार्याची माहिती दिली. स्वागत, प्रास्ताविक पर्यटन व प्रवास सुविधा केंद्राच्या समन्वयक डॉ. मीना पोतदार यांनी केले. डॉ. डी. एच. पवार यांनी आभार मानले.

पुढारी

# तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कौशल्य विकसित केल्यास रोजगाराच्या संधी : प्रा. डॉ. जोशी

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** कोरोनाच्या नवीन संकटामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल होत आहेत. अशातच शैक्षणिक क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कौशल्य विकसित केल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, असे प्रतिपादन भारती विद्यापीठाच्या आबेदा इनामदार कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्सच्या इंग्रजी विभागप्रमुख प्रा. डॉ. मुकुल जोशी यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने उच्चशिक्षण व रोजगाराच्या संधी या विषयावर आयोजित ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवडा - २०२१ मधील 'इंग्रजी विषयातील करिअरच्या संधी' या विषयावर त्या बोलत होत्या. डॉ. जोशी म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात असताना त्याला पूरक अशा कौशल्यावर आधारित शॉर्ट टर्म कोर्सेसची जोड दिली पाहिजे. प्रास्ताविक सहा. प्रा. डॉ.प्रकाश बेळीकट्टी यांनी केले. प्रा. परशराम देवळी यांनी आभार मानले.

पुढारी

# विद्यापीठ प्रवेश परीक्षांना प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या एम.ए., एम. कॉम., एलएलएम भाग१, एम. लिब. या नियमित अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षांना प्रारंभ झाला असून दि. १२ ऑक्टोबरपर्यंत या परीक्षा होणार आहेत. एमएससी जिऑलॉजी व एमएससी शुगर टेक्नॉलॉजी, एमएससी अल्कोहोल टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमांची प्रवेश फेरी ही गोखले कॉलेज, राजारामबापू इन्स्टिटयूट ऑफ शुगर टेक्नॉलॉजी, साखराळे येथे आयोजित करण्यात आली आहे.

तरूण भारत

# विद्यापीठात दूरशिक्षणतर्फे रोजगाराच्या संधीवर मार्गदर्शन

**कोल्हापूर :** कोरोनाच्या संकटामुळे शिक्षण क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत. अशातच शैक्षणिक क्षेत्रात तंत्रज्ञाच्या माध्यमातून कौशल्य विकसित केल्यास रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, असे मत भारती विद्यापीठाच्या आबेदा इनामदार कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्सच्या इंग्रजी विभागातील विभागप्रमुख डॉ. मुकुल जोशी यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्राच्या वतीने उच्चशिक्षण आणि रोजगाराच्या संधी या विषयावरील आयोजित ऑनलाईन करिअर मार्गदर्शन पंधरवाडा" या कार्यक्रमात ते बोलत होते. इंग्रजी विषयातील करिअरच्या संधी हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. डॉ. जोशी म्हणाल्या, विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या प्रवाहात असताना त्याला पूरक अशा कौशल्यावर आधारित शॉर्ट टर्म कोर्सेसची जोड दिली पाहिजे. प्रास्ताविक डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी केले. आभार प्रा. परशराम देवळी यांनी मानले.

30 SEP 2021 तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील ३४९ विषयांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या परीक्षांपैकी आतापर्यंत ३४९ परीक्षांचे निकाल ऑनलाईन जाहीर करण्यात आले आहेत. यामध्ये बी. एस्सी., एम. एस्सी., नॅनो सायन्स अँन्ड टेक्नॉलॉजी, एम. एड., एम. बी. ए., डिप्लोमा इन क्लासिकल डान्स, ब्रिज कोर्स इन ड्रामॅटिक्स, एम. आर. एस., डिप्लोमा इन क्लासिकल म्युझिक, डिप्लोमा इन क्लासिकल डान्स आदी विषयांचा समावेश आहे.

तसेच बुधवारी झालेल्या ऑनलाईन पुनर्परीक्षेला ११४७९ पैकी १०६९० विद्यार्थी उपस्थित होते. ज्यांना तांत्रिक अडचण आली आहे, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विद्यापीठ कर्मचारी आणि सॉफ्टवेअर पुरवठा कंपनीची यंत्रणा कार्यरत आहे. तरी विद्यार्थ्यांनी अडचण आल्यास विद्यापीठाशी संपर्क साधावा.